
दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक २४ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.१४ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.
Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# महायुतीचे सरकार आल्यास शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी

## देवेंद्र फडणवीसांचे डहाणूच्या सभेत मोठे आश्वासन

**मुंबई (वृत्तसंस्था)**
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डहाणू येथील सभेत बोलताना मोठे आश्वासन दिले आहे. राज्यात महायुतीचे सरकार आले, तर शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी देण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी डहाणूच्या विकासाबाबतही भाष्य केले. वाढवण बंदरामुळे भूमिपुत्रांना रोजगार मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले. तसेच डहाणूचा विकास करताना नैसर्गिक संपदा आणि जैवविविधतेवर गदा येणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले.

वाढवणच्या बंदरामुळे डहाणू भागाचे चित्र बदलेल. मासेमारी करणारे कोळी बांधवांवर कोणताही अन्याय होणार नाही. पण आहे त्यापेक्षा चांगली अवस्था आम्ही तुम्हाला आणून देऊ. हा देवाभाऊचा शब्द आहे. तुमच्या पारंपारिक व्यवसायाला नवी उंची कशी मिळेल. याची योजना आम्ही आखली आहे. त्यामुळे पुढील काळात कोळी बांधव समृद्ध झालेले पहायला मिळतील, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते डहाणू येथे प्रचार सभेत बोलत होते. अनेकांनी वाढवण बंदराला विरोध केला होता, असे म्हणत फडणवीसांनी विरोधकांवर निशाणा साधलाभगवान मिरडा मुंडांना मानणारे आम्ही आहोत. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरडा मुंडांची जयंती आहे. संपूर्ण भारतात ही १५० वी जयंती एक वर्षापर्यंत साजरी करणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले असल्याचे फडणवीस म्हणाले. भगवान बिरसा मुंडा यांची प्रेरणा घेऊन डहाणू आणि पालघरच्या आदिवासींचे जल, जंगल आणि जमीन कुणालाही घेऊ देणार नाही, असे आम्ही ठरवल्याचेही फडणवीस म्हणाले.फडणवीस म्हणाले, शहर वाढत आहे. शहरांच्या गरजा आणि लोकसंख्या वाढत आहे. विकासाची गरज आहे. मात्र, १९९१ च्या नोटिफिकेशनमुळे डहाणूचा विकास रखडल्याचे फडणवीस म्हणाले. आम्ही त्या नोटिफिकेशनच्या विरोधात नाहीत. त्यातील पर्यावरणवादी विषयाला आमचेही समर्थन आहे. पण, १९९१ आणि २०२४ मध्ये वस्तुस्थिती, नियम आणि टेक्नॉलॉजी बदलली आहे. त्यामुळे १९९१ च्या परिपत्रकामुळे डहाणूच जो विकास थांबला आहे, जीव गुदमरत आहे, त्यातून डहाणूला मोकळे करण्याचा आम्ही निर्णय घेतला असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.डहाणूचा विकास करताना येथील नैसर्गिक संपदा, जैवविविधता यांच्यावर कुठलाही डाग येऊ देणार नाही. सामान्य माणसाचे जीवन कसे सुकर करता येईल, असा आमचा प्रयत्न असेल. वाढवण बंदरामुळे १० लाख रोजगाराच्या संधी तयार होत आहेत. या संधी भूमिपुत्रांना मिळायला हव्यात, यासाठी भूमिपुत्रांचे स्कील डेव्हलपमेंट करण्याचे काम सुरू केले आहे. येत्या काळात भूमिपुत्रांच्या हाताला काम दिले जाणार असल्याचेही फडणवीस म्हणाले.



### पालघरला विमानतळ बांधणार

**आशियातील सर्वात मोठे बंदर डहाणूमध्ये होणार आहे. बुलेट ट्रेन या भागातून जाणार आहे. मुंबईचा कोस्टल रोड देखील विरारपर्यंत आणतो आहोत. नरीमन पॉईंटपासून विरारपर्यंत केवळ ३५ ते ४० मिनिटांत येता येईल. या कोस्टल रोडसाठी जपानमध्ये गेलो होतो. जपानमधील सरकारने ५४ हजार कोटी रुपये देण्याची कबुली दिली. त्यामुळे मुंबई पालघरला जोडले जात आहे. एकीकडे रस्ता, दुसरीकडे रेल्वे, तिसरीकडे बंदर आहे. आता फक्त विमानतळाची कमतरता आहे. आता या भागात नवीन विमानतळ देखील बांधणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तशी घोषणा केली आहे.**

## नितीन गडकरींचा काँग्रेसवर हल्लाबोल: अर्धा पगार तुम्ही, अर्धा आम्ही आणि गावोगावी रोजगार हमी

**अंबड । प्रतिनिधी**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी जालन्यातील अंबड येथील प्रचार सभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. पं. नेहरूंच्या पंतप्रधानपदाच्या काळापासून काँग्रेसने स्विकारलेली धोरणं देशाच्या विकासासाठी अपयशी ठरली असल्याचा आरोप गडकरींनी केला. आम्ही १० वर्षांत केलेलं काम काँग्रेस ६० वर्षांत करू शकली नाही, असं ते म्हणाले.गडकरींनी त्यावेळी काँग्रेसच्या धोरणांचा तपशील सांगितला, ज्या अंतर्गत स्टील उद्योग, सोन्याची आणि कोळशाची खाणी या क्षेत्रांमध्ये देशाचा पैसा गुंतवला गेला. तथापि, हे उद्योग फायदेशीर ठरले नाहीत. जर त्या काळात रस्ते, शेतकऱ्यांच्या सिंचन समस्यांवर उपाय, आणि ग्रामीण भागातील शाळा व दवाखाने उभे केले असते, तर आज देशाची परिस्थिती वेगळी असती, असं गडकरींनी स्पष्ट केलं.



घराणेशाहीवर हल्ला:गडकरींनी काँग्रेसवर घराणेशाहीचे आरोप केले. काँग्रेसने गरिबी हटावचा नारा दिला, पण त्या नाऱ्यातून कोणाची गरिबी हटली? असं प्रश्न विचारत, त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांसाठीच विविध शिक्षण संस्थांची व इतर संधींची व्यवस्था केल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांची, शेतमजुरांची गरिबी तरी काय कमी झाली? अशी टीका गडकरींनी केली.

काँग्रेसच्या शिक्षण धोरणावर टीका: गडकरींनी काँग्रेसच्या अर्धा पगार योजना आणि रोजगार हमी योजनेवरही निशाणा साधला. काँग्रेसने शाळांमध्ये 'अर्धा पगार तुम्ही, अर्धा आम्ही' असा धोरण स्वीकारला, असं ते म्हणाले.

देशभर रस्त्यांची कामे:गडकरींनी सरकारच्या रस्त्यांच्या कामांचा गौरव करत, आताच्या काळात जम्मू काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत रस्त्यांचे काम सुरू आहे. महाराष्ट्राला १२ हजार कोटी रुपये दिले आहेत, असं सांगितलं. पुणे ते छत्रपती संभाजी नगर रस्ता तयार होईल आणि नंतर तो नागपूरपर्यंत जाईल, ज्यामुळे ६ तासात नागपूरला पोहोचता येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.जातिवादावर गडकरींचा स्पष्टपण:जातिवादावर भाष्य करत, गडकरींनी म्हटलं की, जात, पंथ आणि भाषा यामुळे माणूस मोठा होत नाही. माणूस त्याच्या गुणांनी मोठा होतो. त्यांनी उदाहरणे दिली, आपण एकनाथ महाराज, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची जात पाहतो का? गडकरींनी लोकसभा निवडणुकीत जातिवादावर तडजोड न करण्याचा स्पष्ट इशारा दिला. नितीन गडकरींच्या या भाषणात काँग्रेसच्या धोरणांचा तीव्र विरोध आणि विकासकामांच्या बाबतीत सरकारच्या कामगिरीचा जोरदार समर्थन करण्यात आले.

## घरात घुसून वृद्धांना मारहाण, दागिने व रोख रक्कम लुटली



**वैजापूर । प्रतिनिधी**
वैजापूर तालुक्यातील भोकरगाव शिवारातील शेतवस्तीवर रविवारी रात्री ११ वाजेच्या दरम्यान एक धक्कादायक चोरीची घटना घडली. शेतात राहत असलेल्या वृद्ध दांपत्यावर दोन आरोपींनी घरात घुसून बेदम मारहाण केली, तसेच महिलेचे दागिने व घरातील रोख रक्कम लुटून नेली.

जिजाबाई एकनाथ नागे (वय ६५) आणि त्यांचे पती शेतवस्तीवर राहतात. रविवारी रात्री विजू राजपूत (र. झोलेगाव, ता. वैजापूर) व त्याच्या साथीदारांनी जिजाबाई आणि त्यांच्या पतीला घरात घुसून मारहाण केली. जिजाबाई यांना चाकूने वार केले आणि पतीला जीवे मारण्याची धमकी देत कानातील दोन झुंबर व घरातील ७० हजार रुपये लुटले. चोरी करून आरोपी पसार झाले.

जिजाबाई यांनी शिऊर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, त्यावरून विजू राजपूत आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बीट जमादार गणेश गोरक्ष करत आहेत.

पोलिसांनी तातडीने तपास सुरु केला असून, आरोपींचा शोध घेत आहेत. घरातील वृद्धांना अशी घटना टाळण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

## वर्ध्यात अवैध ड्रग्ज विक्री करणाऱ्या दोघांना पोलिसांची अटक; ८.६७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा । प्रतिनिधी**
वर्धा शहरात एमडी (मॅफेड्रॉन) ड्रग्ज विक्री करणाऱ्या आणि त्यास पुरवठा करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. मंगळवार, १२ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री नागपूर रोडवरील यमुना लॉन चौकात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी आरोपींकडून ८ लाख ६७ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपींच्या नावांमध्ये अजिंक्य उर्फ अज्जू बोरकर (३०), रा. ईश्वरनगर नालवाडी आणि ड्रग्ज पुरविणारा वसिम अहमदखान पठाण (३१), रा. झाकीर हुस्सेन कॉलनी, वर्धा यांचा समावेश आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारावर, अजिंक्य बोरकर हा एमडी ड्रग्जची विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी गोपुरी चौकात नाकाबंदी केली आणि एमएच १२-के.एन.५१५३ क्रमांकाची कार थांबवून तपासणी केली. या तपासणी दरम्यान अजिंक्यच्या जवळून २ ग्रॅम ५२ मिलीग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त झाले. पोलिसांनी त्याला अटक केली आणि त्याचबरोबर वसिम पठाण यालाही ताब्यात घेतले.या कारवाईत पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश लसुंते, हमीद शेख, गजानन लामसे, अमोल नगराळे, श्रीकांत खडसे, गजानन दरणे, राजेश तिवस्कर, मनीष कांबळे, मंगेश आदे, उदय सोळंकी आणि दीपक साठे यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून, आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर कारवाई केली जात आहे.

## काटोल विधानसभा मतदारसंघात देवेंद्र फडणवीस यांचा अनिल आणि सलील देशमुखांवर घणाघात; विकासावरही केली टीका

**नागपूर । प्रतिनिधी**
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काटोल विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार चरनसिंग ठाकूर यांच्या प्रचारासाठी देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार सभेत हजेरी लावली. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते अनिल देशमुख आणि सलील देशमुख यांच्यावर जोरदार घणाघात केला.

फडणवीस यांनी आपल्या भाषणात अनिल देशमुख यांच्या संदर्भात गंभीर आरोप केले. न्यायमूर्ती चांदीवाल यांनी अनिल देशमुख यांना क्लिन चिट दिली नसल्याचा गौप्यस्फोट केला आहे. त्यांच्यावर १०० कोटी रुपयांच्या वसुलीचे आरोप आहेत आणि त्यावर सरकारला त्यांच्याच माणसाने आरोप केले. न्यायालयाने उच्च स्तरावर चौकशीचे आदेश दिले आणि सीबीआयकडे प्रकरण सोपवले, असे फडणवीस म्हणाले. त्यांनी असेही स्पष्ट केले की, न्यायालयाने जामीन देताना म्हटले की, प्रकरण गंभीर आहे आणि त्यांच्याविरोधात पक्के पुरावे आहेत.

फडणवीस यांनी सलील देशमुख यांच्यावरही तीव्र आरोप केले. सलील देशमुख यांच्यावर न्यायमूर्ती चांदीवाल यांनी मोठा खुलासा केला आहे. ते ४० लाख रुपयांच्या बदलीसाठी साचिन वाझे यांच्या तोंडून पुरावा मिळवण्यात आले होते, परंतु तो पुरावा माझ्या कार्यक्षेत्राबाहेर होता. अशा उमेदवारांना निवडून दिल्यास आपल्या विकासाचा प्रश्न काय? असा सवाल फडणवीस यांनी उपस्थित केला.

त्यांनी काटोल विधानसभा क्षेत्राच्या मागासलेपणावरही ताशेरे ओढले. काटोल क्षेत्र इतके मागे का राहिले? इथे अद्याप विकास का नाही? इतक्या वर्षानंतरही या भागात विकासाची मागणी का होईल? अशी तीव्र टीका त्यांनी केली. यानंतर फडणवीस यांनी मतदारांना प्रश्न केला, या प्रकारच्या उमेदवारांना निवडून देऊन आपला विकास कसा होईल?फडणवीस यांच्या या आरोपांमुळे काटोलमधील प्रचारात आणखी उत्सुकता निर्माण झाली आहे. भाजपने आपल्या उमेदवाराच्या प्रचारासाठी जोरदार फटकेबाजी केली आहे, आणि यामुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय रंगत अधिकच वाढली आहे.



## १५ नोव्हेंबर रोजी स्वीप अंतर्गत मॅराथॉन रॅलीचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
मतदान जनजागृतीसाठी जिल्हा प्रशासनातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत असून शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.१५ वाजता मॅराथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.'माझे मत माझा अधिकार', 'होय मी मतदान करणारच', 'आपण सगळे मतदान करू या - लोकशाहीला बळकट करू या' अशा विविध घोषवाक्यांसह १८ व १८ वर्षावरील सर्व स्त्री - पुरुष यात मोठ्या संख्येने सहभागी होणार असून रॅलीद्वारे मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. मॅराथॉन रॅलीचे उद्घाटन आझाद बगीचा येथे करण्यात येणार आहे. त्यानंतर सदर रॅली गिरनार चौक ते पठाणपूरा गेट ते गांधी चौक ते जटपुरा गेट रोड ते परत आझाद बगीचा येथे रॅलीचा समारोप होईल. रॅलीत सहभागी विद्यार्थी/नागरिकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था सुद्धा केली जाणार आहे.सदर रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी, नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी संजय पवार यांनी केले आहे.



# सुमित वानखेडे आमदार होणार खा.अनिल बोंडे यांचा विश्वास




**तळेगाव । शामजीपंत**

सुमित वानखेडे यांनी एखाद्या विषयाला हात घातला की तो निश्चितपणे मार्गी लागतो. त्यांच्यात दूरदृष्टी, जिज्ञासा, चिकाटी आणि अफाट कामाची ऊर्जा आहे, असा विश्वास खासदार अनिल बोंडे यांनी व्यक्त केला. तळेगाव येथे १२ रोजी आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते.

खासदार बोंडे म्हणाले, सुमित वानखेडे यांना दिलेले मत हे तुमच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरेल. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तृत आहे, आणि ते कोणत्याही अडचणीला सामोरे जाऊ शकतात.

तळेगाव येथील या प्रचारसभेला प्रमुख उपस्थिती म्हणून सुधीर दिवे, अंकिता होले, रमजान अन्सारी, वरुण पाठक, रोमी भिंडर, सुरेश नागपुरे, नयनसुख लड्ढा, प्रशांत काकपुरे, सचिन होले, हेमलता भगत, हिना कोंडुलकर, गुणवंत नरंगे, मुस्ताक पठाण, ज्ञानेश्वर बाबरे, हरीदास तुंमडाम, रूपेश बोबडे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी सुधीर दिवे यांनी आर्वीतील विकासाच्या अभावाचा उल्लेख करत विरोधकांवर टीका केली. आर्वीचा विकास झालेला नाही. मग पुन्हा ४० वर्षांनी तेच घराणे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, सुप्रिया सुळे यांना एका एकरात २ कोटींची वांगे कशी झाली? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी विरोधकांवर ताशेरे ओढले.

सुमित वानखेडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, भूतकाळात काहीही केले नाही आणि भविष्यातही काही सांगता येत नाही, असा आरोप केला जात आहे. मात्र, माझ्या जाहीरनाम्यात नमूद केलेली अनेक विकासकामे मी फक्त सहा महिन्यांत पूर्ण केली आहेत. पाच वर्षांचा कालावधी मिळाल्यास आर्वी विधानसभा क्षेत्राच्या विकासाचे नवीन पर्व तयार होईल.

तळेगाव व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाजप व महायुतीच्या कार्यकर्ते व मतदारांना संबोधित करत सुमित वानखेडे यांनी आपल्या उमेदवारीची ताकद आणि भविष्यकालीन योजनांची माहिती दिली.

# अल्पवयीन मुलींना न्याय मिळवून देणारी मीच ती संगीता

**बदलापूर । प्रतिनिधी**

मुरबाड विधानसभा मतदारसंघात उमेदवार मतदारांना आपल्याकडे वळवण्याचे विविध प्रयत्न करत असताना, मनसेच्या उमेदवार संगीता चेंदवणकर यांनी बदलापूरकरांच्या भावनांशी जुळवून घेत प्रचाराला वेग दिला आहे. काही काळापूर्वी बदलापूरमधील शाळेत साडेतीन वर्षांच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली होती, ज्यामुळे बदलापूरमध्ये संतापाची लाट उसळली. त्या वेळी संगीता चेंदवणकर यांनी पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन केले होते, ज्यात बदलापूर रेल्वे स्थानकावर मोठे आंदोलन झाले होते. त्यांच्या या आक्रमक भूमिकेला मान्यता देऊन राज ठाकरे यांनी त्यांना मुरबाड मतदारसंघात उमेदवारी दिली आहे.

सध्या चेंदवणकर प्रचारात स्वतः ग्राउंड लेव्हलवर उतरून काम करत आहेत. बदलापूरकरांनो, मला एकदा संधी द्या, अल्पवयीन मुलींना न्याय मिळवून देणारी मीच ती संगीता असे पोस्टर घेऊन त्यांनी बदलापूर स्थानकाबाहेर




प्रचार सुरू केला आहे. या भावनिक आठवणीमुळे स्थानिक मतदारांच्या मनात संगीता चेंदवणकर यांच्याबद्दल सहानुभूती वाढत असून, याचा परिणाम मतदानावर होण्याची शक्यता आहे.

तसेच, महाराष्ट्रात कोरोना काळात नागरिक आरोग्य, शिक्षण, आणि हॉस्पिटलचे बिल यांसारख्या समस्यांवर उपाय म्हणून राज ठाकरे यांची भेट घेत होते. यामुळे, जर महाराष्ट्रातील जनतेने मनसेला सक्षम पर्याय दिला, तर पुढील मुख्यमंत्री म्हणून राज ठाकरे असतील, असे चेंदवणकर यांनी मत व्यक्त केले.

# एकलव्य महाराष्ट्र राज्य आदिवासी संघटनेच्या मेळाव्यात महाविकास आघाडीला पाठिंबा

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैष्णवी लॉन्स येथे आयोजित एकलव्य महाराष्ट्र राज्य आदिवासी संघटनेच्या मेळाव्यात संघटनेने महाविकास आघाडीला जाहीर पाठिंबा दिला. या मेळाव्यात माजी राज्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव ढवळे यांच्या उपस्थितीत संघटनेने महायुतीविरोधात आपली भूमिका स्पष्ट केली, ज्यामुळे आगामी निवडणुकीत महायुतीला फटका बसण्याची शक्यता आहे.



मेळाव्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या मशाल चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी संघटनेच्या प्रतिनिधींनी समाजबांधवांशी संवाद साधत, निवडणुकीत भरघोस मताधिक्याने विजय मिळवण्यासाठी एकजुटीची विनंती केली.

कार्यक्रमाला सह संपर्कप्रमुख विलास जाधव, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब संचेती, उपनगराध्यक्ष हाजी अकिल, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अविनाश पाटील गलांडे, तालुकाप्रमुख सचिन पाटील वाणी, माजी जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाप्रमुख मंजाहरी पाटील गाढे, शहर प्रमुख प्रकाश चव्हाण, बाळासाहेब जानराव, तालुकाप्रमुख रमेश हाडोळे, सरपंच शरद बोरनारे, विजय त्रिभुवन यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दलित आघाडीचे तालुकाप्रमुख धर्मेंद्र त्रिभुवन, उपशहर प्रमुख कडू भाऊ त्रिभुवन, रोशन त्रिभुवन यांनी विशेष मेहनत घेतली.

# काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव जगताप यांचा नारायणराव पाटील यांना बिनशर्त पाठिंबा

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार नारायण (आबा) पाटील यांच्या प्रचारासाठी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव नामदेवरावजी जगताप यांनी बिनशर्त पाठिंबा दिला आहे. करमाळा तालुक्यातील सर्व काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह अधिक सक्रिय होऊन नारायण आबा पाटील यांना विजयी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

जगताप म्हणाले की, वाढती महागाई व बेरोजगारी यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली आहे आणि राज्यात परिवर्तनाची गरज आहे. या परिस्थितीत महाविकास आघाडीचे धर्म



पाळत आगामी सात दिवसांत प्रचारात आणखी गती आणून पाटील यांना भरघोस मतांनी निवडून आणण्यासाठी काँग्रेस पदाधिकारी आणि शाखा कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व सोलापूर जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राहणार असल्याचेही जगताप यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी असेही सांगितले की, संपूर्ण तालुक्यात बदलाची हवा असून पाटील यांचा विजय निश्चित आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी गावागावांत पोहोचून मतदारांशी संवाद साधावा व मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे आवाहनही त्यांनी केले

# शिवम चिखले राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णपदक विजेता

**सोलापूर । प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय

तील विद्यार्थी शिवम राजेंद्र चिखले याने ६८ व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून नॅशनल चॅम्पियन बनण्याचा मान मिळवला आहे. ही स्पर्धा स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ गुजरात व फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते १२ नोव्हेंबर २०२४ रोजी मरिंदा, नदीयाड, गुजरात येथे जिल्हा क्रीडा कोचिंग सेंटरमध्ये आयोजित करण्यात आली होती.

१७ वर्षांखालील वयोगटातील मुलांच्या



रिकव्ह प्रकारात महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना शिवमने उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने ७२० पैकी ६७० गुण मिळवत देशात सहावा क्रमांक प्राप्त केला व खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली. शिवमच्या या यशामध्ये महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. राम काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

शिवमच्या सुवर्ण कामगिरीमुळे करमाळा तालुक्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर गाजले आहे. या यशाबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# भुसावळात हारे के सहारे की जय च्या जयघोषात भक्तीमय वातावरण



**भुसावळ । प्रतिनिधी**

श्री श्याम बाबा जन्मोत्सव व श्री जगन्नाथ भगवान जन्मोत्सवाच्या निमित्ताने भुसावळ शहरातील स्टार लॉन्स येथे आयोजित महाकिर्तनाने शहर भक्तीमय झाले. मंगळवारी रात्री खरगोन (मध्यप्रदेश) येथील सुप्रसिद्ध भजन गायक शिवम रावल यांच्या मधुर वाणीने शेकडो भाविक मंत्रमुग्ध झाले.

महाकिर्तनाच्या कार्यक्रमाला भुसावळसह मलकापूर, जळगाव, बुरहानपूर, नाशिक, नशीराबाद, अकोला, बोरवड आणि नंदुरबार येथूनही भाविकांची मोठी गर्दी जमली होती. हारे के सहारे की जय च्या गजरात शहरात भक्तीचा रंग भरला होता.

महाकिर्तनानंतर शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाचे वातावरण भक्तिरसात न्हालले होते.

# राजकीय पार्ट्यांच्या उरलेल्या अन्नामुळे बकऱ्यांचा मृत्यू; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**मूल । प्रतिनिधी**

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात राजकीय संघर्षाने उचांग गाठले असतानाच, मूल तालुक्यातील फिस्कुटी गावात एक विचित्र आणि दुःखद घटना घडली आहे. एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी आयोजित पार्टीतील उरलेले अन्न खाल्याने पाच बकऱ्यांचा मृत्यू झाला असून, दहा बकऱ्या गंभीर अवस्थेत आहेत. उरलेले अन्न खुले सोडल्याने गावातील शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे, आणि यामुळे गावात संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी फिस्कुटी गावात एका राजकीय पक्षाच्या उमेदवाराची कार्यकर्त्यांसाठी पार्टी आयोजित करण्यात आली होती. पार्टीत उरलेले अन्न खुले सोडल्याने तेथील जनार्धन जिल्लेवर यांच्या तीन आणि दशरथ बोरुले यांच्या दोन बकऱ्यांचा मृत्यू झाला. अन्न खाल्याने बकऱ्यांचे पोट फुगून त्यांची प्रकृती खालावली, ज्यात पाच बकऱ्यांचा मृत्यू झाला, तर उर्वरित बकऱ्या मरणाच्या दारावर आहेत. या घटनेमुळे गावातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

# तळोधी पोलिस ठाणे हद्दीत विविध गावांमध्ये पोलिसांचा रूट मार्च

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका शांततेत व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी तसेच पोलिसांविषयी नागरिकांमध्ये विश्वास व आदरभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने तळोधी पोलिसांनी विविध गावांत रूट मार्च आयोजित केला. बुधवार, १३ नोव्हेंबर रोजी झालेल्या या रूट मार्चमध्ये एच कंपनी बटालियन राजस्थान पोलिसांच्या दोन अधिकाऱ्यांसह ४८ अमलदार आणि तळोधी पोलिस ठाण्यातील एक अधिकारी व तीन अमलदार असे एकूण ५२ पोलीस सहभागी झाले होते.

या रूट मार्चमुळे पोलिसांची उपस्थिती व कर्तव्यनिष्ठा अधोरेखित करण्यात आली. तळोधी (बा.), सावरगाव, नांदेड, गोविंदपूर या गावांमध्ये रूट मार्च काढून जनतेला शांततेत निवडणुका पार पाडण्यासाठी सहकार्याचे आवाहन करण्यात आले.



# यशवंत माने यांना जनता पुन्हा संधी देणार-राजन पाटील

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), भाजपा, शिवसेना (शिंदे गट) महायुतीचे उमेदवार यशवंत माने यांच्या प्रचार सभेत सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील यांनी माने यांना पुन्हा एकदा संधी देण्यासाठी जनतेचा भरभरून प्रतिसाद मिळत असल्याचा विश्वास व्यक्त केला. विरोधकांना जनतेच्या समस्यांची जाणीव नसल्याने ते फक्त विरोधासाठी विरोध करत आहेत, असे पाटील यांनी सांगितले.

मोहोळ विधानसभा मतदारसंघात तीन हजार कोटींचा विकास निधी आणून यशवंत माने यांनी मोठी विकासकामे केली आहेत. शेतकऱ्यांना पाणी मिळावे म्हणून आमच्या कार्यकर्त्यांनी गुन्हे अंगावर घेतले. मात्र, द्वेषी आणि मत्सरी विरोधक एकत्र आले असले तरी जनता त्यांना बाजूला सारून माने यांना पुन्हा विधानसभेत पाठवेल, असे



पाटील यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी आमदार यशवंत माने यांनी आपल्या मागील पाच वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, विकासकामे करताना गट, तट, पक्ष पाहिला नाही. शेतकरी, कष्टकरी आणि शिक्षण यांसाठी सरकारने अनेक योजना आणल्या आहेत, तसेच मोफत शिक्षण योजना आणि दिवसा वीज पुरवठ्याच्या उपाययोजना सुरू आहेत, असे माने यांनी सांगितले.

या सभेत जगन्नाथ कोल्हाळ, नागेश साठे, बाळासाहेब पाटील, सतीश काळे, ज्योत्स्ना पाटील, महेश पवार, गोविंद पाटील, बालाजी साठे, दादा करणावर, प्रदीप साठे, ब्रम्हदेव फंड, गणेश जगताप, शशिकांत कोल्हाळ, नाना ढवण, बाबा पाचफुले, विजयकुमार पाटील, आबासाहेब धावणे यांसह महायुतीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकरपूर-भागाठाण रस्त्याची दुर्दशा मतदारसंघात नाराजीची चर्चा

**गंगापूर । प्रतिनिधी**

वैजापूर-गंगापूर मतदारसंघात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा जोर सुरू असून सर्वपक्षीय नेते मतदारांच्या भेटीसाठी गावागावात जात आहेत. मात्र, याच मतदारसंघातील भागाठाण ते शंकरपूर दरम्यानच्या दीड किलोमीटर रस्त्याची दुरवस्था हा चर्चेचा विषय ठरला आहे.

आमदार प्रा. रमेश बोरणारे यांनी सत्तेत आल्यावर मतदारांचे आभार मानत एकदा जाहीर केले होते की, ज्या गावात डांबरी रस्ता नसेल, त्या गावात २०२४ ला मतदान मागायला जाणार नाही. परंतु, गंगापूर तालुक्यातील भागाठाण ते शंकरपूर या रस्त्याची २५ वर्षांपासून दुरवस्था कायम आहे. या रस्त्यावर खड्डा आहे की, खड्ड्यात रस्ता हेच ओळखणे कठीण झाले आहे, अशी नाराजी मतदारांत आहे.

गावकऱ्यांचा आरोप आहे की, आमदार बोरणारे यांनी या रस्त्याचे काम का केले



नाही? त्यामुळे बोरणारे यांनी दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला की काय, अशी चर्चा जोरात सुरू आहे. या दीड किलोमीटर रस्त्यावर प्रवास करणे इतके कठीण झाले आहे की, शामको शंकरपूर जाने निकले तो होता हैं सवेरा, अशी अवस्था जनतेवर आली आहे. मतदारसंघात रस्त्याच्या या अवस्थेमुळे नागरिकांत नाराजी आहे आणि यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### गडीसुर्ला गावातील नागरिकांशी साधला संवाद

# विकासकामांतून साधणार गोरगरिबांचा कल्याणना-ना.सुधीर मुनगंटीवार

**मूल । प्रतिनिधी**

गडीसुर्ला गावामध्ये अनेक विकासकामे करण्यात आली. या गावाच्या विकासाला अधिक गती देण्याच्या उद्देशाने स्मार्ट अंगणवाडी करिता २० लक्ष रुपये, वाचनालयाकरिता ५० लक्ष, सामाजिक सभागृहाकरिता २५ लक्ष तर गावातील अंतर्गत रस्त्यासाठी ३५ लक्ष रुपयाचा निधी मंजूर करून दिला. यापुढेही या क्षेत्राचा आमदार म्हणून गडीसुर्ला गावाच्या विकासासाठी पूर्ण शक्तीने काम करेल. जात-पात, धर्म न पाहता विविध विकासाची कामे पूर्णत्वास नेली. आवश्यक त्या ठिकाणी निधी उपलब्ध करून दिला. विकासकामांमधून गोरगरिबांच्या कल्याणाचाच ध्यास घेतला आहे, अशी ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

ना.मुनगंटीवार म्हणाले, मुल येथे कृषी महाविद्यालय, मुल-पोंभुर्ण्यातील धडक सिचंन विहिरी, टाटा ट्रस्टच्या माध्यमातून ९० गावांना दत्तक घेण्याचा कार्यक्रम, पाणंद रस्त्याचा बांधणी कार्यक्रम तसेच शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणत २०२ कोटी रुपयाचा पिक विमा देवून विदर्भामध्ये चंद्रपूरला प्रथम क्रमांकावर नेत जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांचा पीक विम्याचा प्रश्न निकाली काढण्याचे कार्य केले. शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाचे मिळून १२ हजार रुपये देण्यात येत आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात धानाचे उत्पादन घेतले जाते. विधानसभेत संघर्ष करत धान उत्पादक शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणून हेक्टरी २० हजार रुपये धानाचा बोनस मिळवून दिला. येत्या वर्षभरात शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचेही ते म्हणाले.

**गडिसुर्लाच्या विकासासाठी करण्यात येणारी विकासकामे**

पुन्हा एकदा राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर गडिसुर्ला गामपंचायतीमध्ये अंतर्गत रस्ते, सोलर व्यवस्थेसह पिण्याची पाण्याची योजना, गामपंचायत इमारत नुतनीकरण, स्मशानभुमी बांधकाम, पाणंद रस्ते, गाव जनसंपर्क अभियान, आरोग्य शिबीर, सिचंनाची व्यवस्था, उद्योगासाठी रोजगार नोंदणी, नेत्रचिकित्सा शिबीर, तक्रार निवारण सभा, गाव तिथे शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणात देण्यात येईल. महाराष्ट्रासारख्या वैभवशाली राज्यात महायुतीचे सरकार येऊन महाराष्ट्रासह जिल्ह्याची प्रगती व्हावी यासाठी जात-पात धर्म न पाहता मतरुपी आशीर्वाद देण्याचे आवाहन ना. मुनगंटीवार यांनी केले.

**काँग्रेसला मतदान म्हणजे विनाशाला आमंत्रण**

राज्यात समस्यांचा डोंगर उभा करण्याशिवाय काँग्रेसने काहीही केलेले नाही. काँग्रेस कधीच एवढी विकास कामे करू शकणार नाही. त्यामुळे काँग्रेसच्या खोट्या अपप्रचाराला बळी पडून आपले अमूल्य मत वाया घालवू नये. काँग्रेसला मतदान म्हणजे विनाशाला आमंत्रण असल्याचे ना. मुनगंटीवार म्हणाले.



## वेरूळ येथे २४ नोव्हेंबरपासून पंडित राघवजी प्रदिपजी मिश्रा यांची शिवमहापुराण कथा; सोपान नारखेडे यांचे आयोजन

**गंगापूर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पवित्र ज्योतिर्लिंग स्थळ वेरूळ येथे २४ नोव्हेंबरपासून पंडित राघवजी प्रदिपजी मिश्रा (सिहोर) यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कथा ३० नोव्हेंबरपर्यंत चालणार असून श्री क्षेत्र घृष्णेश्वर महादेव मंदिराजवळील राष्ट्रसंत जनार्धन स्वामी आश्रम येथे होईल. या महाशिवपुराण कथेचे आयोजन सोपान दत्तात्रय नारखेडे यांनी केले असून नियोजनाची जबाबदारी लासूर स्टेशन येथील घृष्णेश्वर प्रतिष्ठानने घेतली आहे.





**भक्तांसाठी विविध सेवा उपलब्ध**

शिवभक्तांसाठी भोजन, पार्किंग, स्वच्छता, आसन व्यवस्था, रांगोळी, टीका लावण्याची सेवा यांसारख्या सुविधांचे आयोजन करण्यात आले आहे. यांसाठी इच्छुक भक्तांनी ९१३०९९५६४७, ९७६३५५०७७७, किंवा ७५८८८११०७ या व्हॉट्सअप क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**पंडित प्रदीपजी मिश्रा यांचा वारसा राघवजी मिश्रा पोहोचवतायत महाराष्ट्रात**

जगप्रसिद्ध महाशिवपुराण कथाकार पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांच्या सुपुत्र पंडित राघवजी मिश्रा हेही शिवमहापुराण कथा आणि भगवान शंकराचे महात्म्य शिवभक्तांपर्यंत पोहोचवत आहेत. महाराष्ट्रात प्रथमच त्यांची कथा वेरूळ येथे संपन्न होणार आहे, त्यामुळे शिवभक्तांची लक्षणीय उपस्थिती अपेक्षित आहे. या काळात पार्थिव शिवलिंग पूजनाचे आयोजन करण्यात आले असून शिवभक्तांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सोपान नारखेडे यांनी केले आहे.

**विशेष माहिती**

पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी भगवान शंकराच्या महात्म्याचा प्रचार जगभर केला असून त्यांच्या कथा ऐकण्यासाठी लाखो शिवभक्त उपस्थित राहतात.

## ऊमरखेड तालुक्यात विविध ठिकाणी तुळशी विवाह उत्साहात संपन्न



**गणेश राठोड । उमरखेड**

: हिंदू संस्कृतीतील एक महत्त्वाचा आणि पवित्र सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुळशी विवाह सोहळ्याचा तालुक्यातील विविध ठिकाणी भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात उत्साहात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

गावागावांमध्ये तुळशीचे पवित्र वृंदावन सजवून, फुलांनी व रांगोळ्यांनी मांडव आकर्षकपणे सुशोभित करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने तुळशी आणि भगवान श्रीकृष्णाचा विवाह विधी संपन्न झाला. महिलांनी मंगलाष्टकांचे गायन करून वातावरण भक्तिमय केले, तर तरुण व मुलांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.तालुक्यातील उमरखेड, इसापूर, पिंपळवाडी, फुलसावंगी यासारख्या गावांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येऊन सामूहिक तुळशी विवाहाचे आयोजन केले. काही ठिकाणी तुळशी विवाहानंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले.

गेल्या काही वर्षांत या सणाचे महत्त्व वाढले असून, पर्यावरण रक्षणासाठी तुळशीच्या रोपांचे वाटपही अनेक गावांमध्ये करण्यात आले. तुळशी विवाहाच्या निमित्ताने धार्मिक, सामाजिक आणि पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या उपक्रमांचे ईसापूर येथील आवधूत मारकवार यांच्यासह परिवाराचे आयोजनही कौतुकास्पद ठरले.या सोहळ्यामुळे तालुक्यात भक्ती, सौहार्द, आणि उत्साहाची वातावरण तयार झाली असून, या मंगलमय पर्वाचा प्रत्येकाने आनंद लुटला

# महाराष्ट्रातील सत्ता देशाला दिशा देईल-सचिन पायलट

**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक निर्णायक ठरणार आहे. संपूर्ण देशाचे लक्ष या निवडणुकीवर आहे. महाराष्ट्रात चुकीची राजनीती झाली असून पक्षांची फूट पडली आहे. भाजप डबल इंजिन सरकार म्हणते, मात्र हे इंजिन फक्त धूर फेकत आहे, असे प्रतिपादन राजस्थानचे उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी केले. पुलगाव देवळी विधानसभा क्षेत्रातील काँग्रेसचे उमेदवार रंजीत प्रताप कांबळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत सचिन पायलट बोलत होते. सर्कस मैदानावर झालेल्या या सभेला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र प्रत्यक्षात ते साध्य झाले नाही, असे सांगत पायलट यांनी भाजपवर टीका केली. योगीजी म्हणतात 'बटोगे तो कटोगे', पण शिक्षण व इतर महत्त्वाच्या मुद्यांवर विचार करायला हवा. 'पढोगे तो बढोगे' हा संदेश दिला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.सचिन पायलट यांनी मतदारांना काँग्रेसला विजयी करून देशाला दिशा देण्याचे आवाहन केले. येथील सरकारच्या रिपोर्ट कार्डमध्ये काहीच नाही, त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर नवीन योजना जाहीर केल्या जात आहेत. रंजीत कांबळे यांना निवडून आल्यानंतर चांगली जबाबदारी देण्यात येईल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना आवाज देणारे दिल्ली किंवा मुंबईत कोणीही उरलेले नाही, असेही ते म्हणाले.



सभेला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आशिष पांडे, माजी जिल्हाप्रमुख प्रशांत शहागडकर, रमेश सावरकर, शिरीष गोडे, जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, अमरावतीचे राजेंद्र गवई, खासदार अमर काळे आणि आमदार रंजीत कांबळे यांनीही संबोधित केले. केंद्रीय निरीक्षक हिना कावरे यांचेही उद्बोधन झाले. सभेचे संचालन अश्विन शहा यांनी केले. सुमारे चार तास उशिरा सुरू झालेली सभा असूनही मोठ्या संख्येने जमलेली जनता जागा सोडून न जाता उपस्थित राहिली.

## करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाचे भविष्य बदलण्याचा निर्धार-आमदार संजयमामा शिंदे

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी दहिगाव उपसा सिंचन योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील असून, आवर्तन कालावधीत एखादा पंप जळाल्यास त्याचा पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. याकरिता दहिगाव टप्पा १ व कुंभेज टप्पा २ येथे प्रत्येकी एक अतिरिक्त पंप बसविण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे योजना अखंडित चालू राहील व शेतकऱ्यांना वर्षभर पाणीपुरवठा होईल, असे आमदार संजयमामा शिंदे यांनी फिसरे येथे आयोजित जाहीर सभेत सांगितले.



योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची बारमाही पिके वाढतील व शेतकरी ऊसाबरोबरच केळीच्या पिकाकडे वळत असून, त्यामुळे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळत आहे, ही समाधानाची बाब आहे. यापुढेही सर्वसामान्य शेतकऱ्यांना बंद नलिका वितरण पद्धतीने पाणी उपलब्ध करून देण्यात येईल, जेणेकरून त्यांच्या जीवनात समृद्धी येईल व करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाचे भविष्य उज्वल होईल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी व्यासपीठावर विलास दादा पाटील, तानाजी बापू झोळ, मनसे तालुकाध्यक्ष संजय बापू घोलप, गणेश भाऊ चिवटे, हनुमंत मांढरे पाटील, भरत अवताडे, अमोल महाराज काळदाते, गौतम ढाणे, राजेंद्र बाबर, सूर्यकांत पाटील, अजित विघ्ने, दत्ता अडसूळ, विवेक येवले, मानसिंग खंडागळे, राहुल कुकडे, सचिन वीर, तसेच फिसरे गावातील प्रदीप दौंडे व संदीप नेटके उपस्थित होते.

सभेत हनुमंत मांढरे पाटील, अमोल महाराज काळदाते, विलास दादा पाटील, विवेक येवले, राजेंद्र बाबर, गौतम ढाणे, अजित विघ्ने, डॉ. विकास वीर, चंद्रकांत सरडे यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भरत अवताडे यांनी मानले.


### वर्धा विधानसभा निवडणुकीत चौरंगी लढतीचे चित्र

# पंकज भोयर,शेखर शेंडे,सचिन पावडे आणि रविंद्र कोटंबकर यांच्यात तुफान स्पर्धा

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापू लागले आहे. या निवडणुकीत चौरंगी लढतीचे चित्र निर्माण झाले असून, महाविकास आघाडीचे शेखर शेंडे, महायुतीचे विद्यमान आमदार पंकज भोयर, तसेच अपक्ष उमेदवार सचिन पावडे आणि रविंद्र कोटंबकर यांच्यात तीव्र स्पर्धा दिसून येत आहे.









वर्धा विधानसभा क्षेत्र दोन प्रमुख भागांत विभागलेले आहे - वर्धा शहर आणि सेलू तालुका. महाविकास आघाडीचे शेखर शेंडे आणि महायुतीचे पंकज भोयर यांच्यात प्रारंभी दुरंगी सामना दिसत असला, तरी अपक्ष उमेदवारांनी त्यात नवा रंग भरला आहे. वर्धा शहरात सचिन पावडे यांच्या प्रचाराला जोरदार प्रतिसाद मिळत असून, त्यांनी मतदारांना आकर्षित करण्याची आघाडी घेतली आहे. दुसरीकडे, सेलू तालुक्यात रविंद्र कोटंबकर यांनी मतदारांमध्ये आपली पकड मजबूत केली आहे, ज्यामुळे या निवडणुकीत चौरंगी लढत होण्याचे संकेत मिळत आहेत.सचिन पावडे यांच्या प्रचारात वर्धा शहरातील मतदारांनी उत्साह दाखवला असून, त्यांच्या समर्थनामुळे शहरात चांगली चैतन्याची लाट दिसून येत आहे. याचप्रमाणे, सेलू तालुक्यात रविंद्र कोटंबकर यांना मिळालेल्या पाठिंब्यामुळे निवडणुकीत नव्या चर्चेला वाव मिळाला आहे.या निवडणुकीत मतदार अधिक जागरूक झाल्याचे दिसत असून, गावातील अनेक कार्यकर्ते सक्रिय झाले आहेत. कोणाच्या हातात सत्ता येईल हे अद्याप निश्चितपणे सांगता येत नसले, तरी निकालानंतरच या स्पर्धेचे चित्र स्पष्ट होईल.वर्धा आणि सेलू तालुक्यातील मतदारांचे विभाजन आणि प्रत्येक उमेदवाराची यश मिळवण्यासाठी आखलेली रणनीती यामुळे या चौरंगी लढतीचे निकाल पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## काँग्रेसच्या प्रचार रॅलीत वर्ध्यात कार्यकर्त्यांमध्ये राडा,गटबाजीला उधाण

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्ध्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये गटबाजीच्या घटना समोर येत आहेत. यामुळे पक्षाच्या प्रचारावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वर्ध्यात तिहेरी लढत जवळपास निश्चित झाली असून, भाजपचे पंकज भोयर, काँग्रेसचे शेखर शेंडे आणि अपक्ष उमेदवार डॉ. सचिन पावडे हे कार्यकर्त्यांसोबत शहर व गावांमध्ये प्रचार करत आहेत. पण काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये सुरू असलेल्या गटबाजीमुळे पक्षाच्या प्रचाराला फटका बसण्याची स्थिती आहे.

काल सकाळी काँग्रेसचे माजी नगरसेवक सलीम कुरेशी आणि स्वयंघोषित समाजसेवक भास्कर इथापे यांच्यात राजकला टॉकीजजवळ जोरदार वाद झाला. त्यानंतर आज सकाळी ११ वाजता काँग्रेसच्याच दोन गटांमध्ये बाजारपेठेत वाद झाले. या वादामुळे काँग्रेसच्या उमेदवारीसाठी जी सकारात्मक भावना होती, ती धुळीला मिळाली आहे.

काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये असलेल्या मतभेदांमुळे पक्षाच्या प्रचारावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या गटबाजीमुळे काँग्रेसच्या नेतृत्वाला धक्का बसण्याची आणि आगामी निवडणुकीच्या प्रचारावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची भीती आहे.



# कोपरगावकरानो विद्यमान आमदाराला घरी बसवा-माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार

**कोपरगाव । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप वर्पे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने शरचंद्रजी पवार यांनी आपल्या भाषणात कोपरगावकरांना आवाहन केले की विद्यमान आमदाराला घरी बसवा. दि.१२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता कोपरगाव शहरात महाविकास आघाडीच्या प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी देशाचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार, महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते बाळासाहेब थोरात, दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, स्टार प्रचारक निलेश कराळे , रमत उपाध्यक्ष भगीरथ शिंदे, राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, उमेदवार संदीप वर्पे, तसेच शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी काँग्रेसचे पदाधिकारी , राष्ट्रवादीचे कार्यकर्ते, आर पी आय कार्यकर्ते व शरदचंद्र पवार यांच्या विचारांचे समर्थक, तसेच शिवसैनिक आदी सह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच संबंध कोपरगाव तालुक्यातून सभेला आलेल्या बंधू व भगिनींची संख्या प्रचंड प्रमाणात होती. यावेळी महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की महायुतीचे सरकार घालून आपल्याला महाविकास आघाडीचे सरकार पुन्हा स्थापन करायचे आहे. कारण महायुतीच्या सरकारने फक्त भुलथापा देऊन लोकांना फसवण्याचे काम सातत्याने चालवले आहे.राज्यात बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे महिला सुरक्षित राहिलेल्या नाहीत .शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव राहिलेले नाही. महागाईचा भस्मासुर मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे सर्वसामान्यांचे जीवन जगणे मुश्किल





झालेले आहे. या सर्व परिस्थितीतून महाराष्ट्राला बाहेर काढून संपन्न समृद्ध महाराष्ट्र करण्यासाठी महाविकास आघाडीचे सरकार आणावे लागेल आणि त्यासाठी कोपरगाव मतदार संघातील तरुण तडफदार उमेदवार संदीप वर्पे यांना आपल्याला विधानसभेमध्ये पाठवावे लागेल, असे आवाहन नामदार थोरात यांनी यावेळी केले.अध्यक्षीय भाषणात माजी कृषी मंत्री शरद चंद्रजी पवार यांनी सांगितले की ज्या वेळेस महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे नापिकीमुळे आत्महत्या करण्याची सत्र चालू झाले होते तेव्हा आम्ही तत्कालीन पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांना या सर्व परिस्थितीची माहिती देऊन देशातील पहिली सर्वात मोठी म्हणजे ७० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याचे काम त्यावेळी केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये महिला सुरक्षित होत्या आणि त्यामुळेच कल्याणच्या सुभेदाराची सून महाराजांच्या पुढे सादर करण्यात आल्यानंतर महाराजांनी म्हटले होते इतक्या सुंदर आमच्या आऊसाहेब असत्या तर आम्हीही सुंदर झालो असतो.असे म्हणून दुश्मनाच्या घरातील स्त्रीला मातेचा दर्जा देत साडीचोळी देऊन सन्मानित करुन तिच्या घरी सुरक्षितपणे पोहचविण्याचे आदेश सैनिकांना दिले होते. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात घडलेला प्रकार महाराष्ट्राला कोणत्या दिशेने घेऊन जात आहे याची विचार करण्याची वेळ आता जनतेवर आलेली आहे. महायुतीकडून उभे असलेल्या आमदार आशुतोष काळे यांचा चांगलाच समाचार यावेळी पवारांनी घेतला.२०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कोपरगावकरांनो आम्ही तुम्हाला आवाहान केल्यानंतर तुम्ही आशुतोष काळे यांना आमदार केले त्यानंतर आम्ही त्यांना साईबाबा संस्थानचे अध्यक्ष पद दिले ज्यास राज्यमंत्रीपदाचा दर्जा आहे ते पद दिले ,रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागाचे चेअरमन पद दिले. ज्यांच्या अंगावर कोपरगावकरांनो तुम्ही गुलाल टाकला तो माणूस आम्हाला अडचणीच्या काळात सोडून गेला. त्यावेळी आमच्या कडून मोठी चूक झाली.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला अधिकार आहे कोणी कुठे जायचं याचे त्यांनी ठरवावं परंतु आता आम्ही या मतदारसंघासाठी एका शिक्षक कुटुंबातील सर्वसामान्य युवकाला तुमचे प्रश्न सोडवण्यासाठी तुमची सेवा करण्यासाठी या ठिकाणी उमेदवारी दिलेली आहे. तुम्हीही संदीप वर्पे सारख्या बिगर कारखानदार पण सर्व सामान्यांच्या सेवेत असणाऱ्या युवकाला लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेत पाठवावे असे आवाहन ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी कोपरगावकरांना केले आहे.

या प्रचारसभेत झालेल्या रेकॉर्ड ब्रेक गर्दीमुळे कोपरगावातील निवडणुकीत सुरुवातीला एकतर्फी वाटणारे वातावरण शरदचंद्र पवारांमुळे आता पूर्णतः बदलून जावून संदीप वर्पे यांची हवा तयार झाली आहे,अशी चर्चा कोपरगावातील नागरिकांमध्ये सुरू झालेली आहे.

# विद्यमान आमदार मोनिका राजळे यांना मोठ्या मताधिक्याने पुन्हा विधानसभेत पाठवा

## डॉ.प्रीतम मुंडे यांचे भावनिक आवाहन

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील भाजपच्या विद्यमान आमदार मोनिका राजळे यांच्या प्रचारासाठी पाथर्डी येथे भव्य सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, ज्यामध्ये भाजपच्या निवडणूक समन्वयक माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी भावनिक अपील करत, माझी बहीण, विद्यमान आमदार मोनिका राजळे यांना मोठ्या मताधिक्याने पुन्हा विधानसभेत पाठवा, असे आवाहन केले.



सभेच्या प्रारंभी भाजप कार्यकर्त्यांनी डॉ. मुंडे यांचे जेसीबीद्वारे फुलांची उधळण करून जंगी स्वागत केले. यावेळी मंचावर विद्यमान आमदार मोनिका राजळे, अभय आव्हाड, डॉ. मृत्युंजय गर्जे, दिनेश अल्हाट, बापूसाहेब पाटेकर, नंदकुमार शेळके, धनंजय बडे, अमोल गर्जे, मुकुंद गर्जे, भगवान आव्हाड, अशोक चोरमले, भगवान बांगर, नारायण पालवे, बाबा राजगुरू, अंकुश कासोळे, वामन कीर्तने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. मुंडे यांनी आपल्या भाषणात राजळे यांच्या कार्यकाळातील विविध विकासकामांचा उल्लेख केला. त्यांनी नमूद केले की, राजळे यांनी ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या गरजांसाठी नेहमीच महत्त्वाचा निधी उभारला आहे. त्यांचे कार्य मतदारसंघातील महिला व युवा वर्गाला प्रेरणा देणारे असल्याचेही त्यांनी सांगितले. पुढील पाच वर्षे राजळे यांच्या माध्यमातून मतदारसंघात विकासाची गंगा वाहत राहील, असे विश्वास व्यक्त करत त्यांनी भाजप कार्यकर्त्यांनी एकजूट ठेवून अधिक जोमाने प्रचार कार्य करावे, असे आवाहन केले. सभा संपता संपता कार्यकर्त्यांनी जय भाजप आणि मोनिका राजळे यांना पुन्हा विधानसभेत अशा घोषणांनी उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले.

# आर्वीत फडणवीस खा.काळे संघर्ष उफाळला

## मयूरा काळे यांना तिकीट मिळाल्याने पवार गटात नाराजी

**आर्वी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आर्वी मतदारसंघात राजकीय उलथापालथी घडत आहेत. काँग्रेसच्या शरद पवार गटातून लोकसभेवर गेलेले खासदार अमर काळे यांनी आपल्या पत्नी मयूरा अमर काळे यांना विधानसभा तिकीट मिळवून दिल्याने निवडणुकीतील रस्सीखेच अधिक तीव्र झाली आहे. भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय सुमित वानखेडे यांना उमेदवारी मिळाल्यामुळे या मतदारसंघातील स्पर्धा चुरशीची झाली आहे.

खा. अमर काळे यांनी नुकताच एक व्हिडिओ जारी करून आपली लढाई दादाराव केचे किंवा सुमित वानखेडे यांच्याविरुद्ध नसून ती थेट फडणवीसांशी आहे, असे ठामपणे सांगितले. हा व्हिडिओ वर्धा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून यामुळे निवडणुकीतील रंगत वाढली आहे. भाजपकडून वानखेडे यांनी लिफ्ट इरिगेशन, औद्योगिक वसाहत, शासकीय रुग्णालय आदी प्रकल्पांसाठी निधी आणला असल्याने भाजपची



स्थिती मजबूत होण्याची शक्यता आहे.

मात्र, शरद पवार गटाचे प्रवक्ता नितेश कराळे यांनी मयूरा काळे यांच्या उमेदवारीवर आक्षेप घेतला आहे. त्यांनी म्हटले की, मयूरा काळे यांनी तिकीट मागितले नव्हते, त्यांचा अर्जही नाही, पुण्यातील मुलाखतींमध्येही त्या उपस्थित नव्हत्या, तरीसुद्धा त्यांना तिकीट देण्यात आले. यामुळे पवार गटात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.आर्वीतील राजकीय समीकरणे अधिकच गडद होत असून, खा. अमर काळे यांचा थेट फडणवीसांवर निशाणा आणि पवार गटातील नाराजीमुळे निवडणुकीतील राजकीय रंगत वाढली आहे.

## नागपुरात काँग्रेस उमेदवार बंटी शेळके यांचा अनोखा प्रचार

# भाजप कार्यालयात जाऊन कार्यकर्त्यांचे आशीर्वाद घेतल्याचा व्हिडिओ व्हायरल

**विधानसभा निवडणुकीच्या वातावरणात एकतेचा संदेश**

**नागपूर शहरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर असे दृश्य दुर्मिळ आहे. पक्ष, धर्म, जात यांच्या सीमा ओलांडून एकतेचे प्रतिक बनलेल्या या कृतीमुळे बंटी शेळके यांनी नागपूरवासीयांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. या घटनेमुळे निवडणुकीतील सौजन्याचे उदाहरण लोकांसमोर आले आहे.**



**नागपूर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तणावपूर्ण वातावरणात नागपुरात एक अनोखी आणि सकारात्मक घटना घडली आहे. काँग्रेसचे उमेदवार बंटी शेळके यांनी भाजप उमेदवार प्रवीण दटके यांच्या प्रचार कार्यालयासमोर जाऊन भाजप कार्यकर्त्यांशी मनमोकळा संवाद साधत एकतेचा संदेश दिला. या घटनेचा व्हिडिओ शेळके यांनी स्वतःच्या ट्विटर हँडलवर पोस्ट केला असून, त्याला नागपूर शहरात भरभरून प्रतिसाद मिळत आहे. बंटी शेळके हे प्रचारासाठी जात असताना अचानक भाजपचे उमेदवार प्रवीण दटके यांच्या कार्यालयासमोर थांबले. तेथील कार्यकर्त्यांशी गोड संवाद साधून शेळके यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले, त्यांना मिठी मारली आणि एकता व सौजन्याचा संदेश दिला. त्यांनी या घटनेचा व्हिडिओ शेअर करत, माझी लढाई व्यक्तीशी नाही, तर विचारांशी आहे. नागपूरमधील प्रत्येक नागरिक माझ्यासाठी महत्त्वाचा आहे. प्रत्येकाला समर्पित सेवा देण्याचा माझा संकल्प आहे, असे लिहिले.हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, आतापर्यंत ३८.८ हजार लोकांनी त्याला पाहिले आहे. नागपूरकरांनी शेळके यांच्या या कृतीचे स्वागत करत कौतुकाचे संदेश दिले आहेत. मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकता व सौजन्याचा संदेश देणाऱ्या बंटी शेळके यांच्या या कृतीमुळे नागपूरवासीय प्रेरित झाले आहेत.

# डॉ.अभिलाषा गावतुरे यांच्या प्रचार दौऱ्यास जनतेचा अभूतपूर्व प्रतिसाद

**मूल । प्रतिनिधी**

डॉ. अभिलाषा गावतुरे यांच्या प्रचार दौऱ्यात जोरदार उत्साह निर्माण झाला असून विविध स्तरांतून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या प्रचार कार्यक्रमात ठिकठिकाणी कॉर्नर सभा, लोकांच्या बैठका होत आहेत, ज्या मोठ्या जाहीर सभांमध्ये रूपांतरित होत आहेत.

प्रचाराच्या दरम्यान विविध संघटनांनी गावतुरे यांना खुला पाठिंबा दिला असून वेगवेगळ्या संघटनांकडून जाहीर समर्थन मिळत आहे. डॉ. गावतुरे यांनी आपल्या प्रसार दौऱ्यात बोरचांदली, राजगड, विरई, फिस्कुटी, भवराळा, चांदापूर, जुनासुर्ला, गडीसुर्ला, भेजगाव, पिपरी दीक्षित, भंजाळी, नवेगाव, बेंबाळ, बोडाळा, नांदगाव, गोवर्धन या गावांना भेटी देत जनतेशी संवाद साधला.



# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत एक्झिट पोल घेण्यावर आणि प्रसारणावर बंदी

**वर्धा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या तरतुदीनुसार एक्झिट पोल घेण्यावर आणि त्यांचे प्रसारण करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या बंदी आदेशानुसार, बुधवार १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७ वाजता ते बुधवार २० नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत कोणत्याही माध्यमाद्वारे एक्झिट पोल घेणे किंवा प्रसारित करणे मनाई असणार आहे.

निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ च्या कलम १२६ क च्या पोट-कलम (१) अंतर्गत या बंदीची घोषणा केली आहे. यानुसार, प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच अन्य कोणत्याही माध्यमातून एक्झिट पोल आयोजित करणे, प्रकाशित करणे किंवा प्रसारित करणे, यावर कडक निर्बंध असणार आहेत. निवडणूक आयोगाने या निर्णयाची सूचना संबंधित विभागांना केली असून, या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई होईल, असे कळविण्यात आले आहे.

यामुळे, २० नोव्हेंबरच्या विधानसभा निवडणुकीत मतदान होईपर्यंत कोणत्याही एक्झिट पोलचा निकाल जाहीर करणे, प्रसारित करणे किंवा प्रसिद्ध करणे पूर्णपणे बंदी असणार आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# गृहमतदानासाठी यंत्रणा पोहचली लोकांच्या दारी

## जिल्ह्यात आतापर्यंत २०८० नागरिकांचे घरून मतदान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सुदृढ लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. याच अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात यंत्रणेने नागरिकांच्या घरी जाऊन मतदान घेतले. आतापर्यंत जिल्ह्यात एकूण २०८० मतदारांनी गृहमतदान करून समाधान व्यक्त केले. यात ८५ वर्षांवरील १७११ मतदारांचा तर ३६९ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.



असे आहे विधानसभानिहाय गृहमतदान : राजूरा विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत ८५ वर्षांवरील ४७८ मतदारांनी आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांग असलेल्या ५३ अशा एकूण ५३१ मतदारांनी गृहमतदान केले. चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील १९७ आणि दिव्यांग २४ असे एकूण २२१ मतदारांनी गृहमतदानात सहभाग घेतला. बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २३८ आणि दिव्यांग ८४ असे एकूण ३२२ मतदारांनी, ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २५१ आणि दिव्यांग ७९ असे एकूण ३३० मतदारांनी, चिमूर विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २६५ आणि दिव्यांग ६४ असे एकूण ३२९ मतदारांनी तर वरोरा विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील २८२ आणि दिव्यांग ६५ असे एकूण ३४७ मतदारांनी गृहमतदान केले.

मतदानाची गोपनीयता : गृह मतदान करतांना मतदान प्रक्रियेची गोपनीयता पाळण्याच्या सुचना भारत निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानुसार फॉर्म १३ – ए (डिक्लरेशन), फॉर्म १३ – बी (कव्हर ए लिफाफा), फॉर्म १३ – सी (कव्हर बी लिफाफा) आणि फॉर्म १३ – डी (मतदान कसे करायचे याबाबत सुचना) आदी प्रक्रियेबाबत अधिकारी व कर्मचा-यांनी सुरवातीला मतदारांना माहिती दिली. यावेळी घरामध्ये स्थापन केलेल्या मतदान कक्षामध्ये सदर मतदारांनी आपले मत नोंदविले. यावेळी मतदान करतांना कोणताही दुसरा व्यक्ती त्यांच्याजवळपास नव्हता. मतपत्रिका घडी केल्यानंतर सदर मतपत्रिका छोट्या लिफाफामध्ये आणि नंतर मोठ्या लिफाफामध्ये टाकून मतपेटीत जमा करण्यात आली.

# भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांची ६२ वी पुण्यतिथी निमित्य विनम्र अभिवादन



**बल्लारपूर । प्रतिनिधी**

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे हे आधुनिक महाराष्ट्रातील स्त्री सुधारणा करणारे एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते.महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे जीवन म्हणजे सामाजिक सुधारणा विशेषतः स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी वाहिलेले आधुनिक ऋषितुल्य जीवन त्यांच्या कार्याचा प्रारंभ हा विधवाविवाह पासून झाला आणि त्याची परिणीती स्त्रियांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठ काढण्यामध्ये झाली स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी अविरत परिश्रम केले.सन. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतवर्षीय महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. १९२० साली विद्यापीठाचे नाव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ असे झाले. महिला च्याविकासासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले यांच्या या कार्याला आदरांजली म्हणून महर्षी धोंडो केशव कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञान संकुल बल्लारपूर येथे पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन केले.कार्यक्रमाला एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाचे, बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले, सहायक कुलसचिव डॉ. बाळू राठोड आणि समन्वयक वेदानंद अलमस्त यांची विशेष उपस्थिती होती. तसेच सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आणि विद्यार्थिनी उपस्थिती होते.

# रवी राणा यांच्या वक्तव्यावर शिंदे, अजित पवार नाराज; अजित पवारांचा टोला– 'त्यांच्या बोलण्यामुळेच बायकोचा पराभव झाला'

**अमरावती । प्रतिनिधी**

बेताल वक्तव्यासाठी प्रसिद्ध असलेले आमदार रवी राणा यांनी अलीकडेच केलेल्या एका विधानामुळे महायुतीतील प्रमुख नेते, विशेषतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नाराज केल्याची माहिती समोर आली आहे. रवी राणा यांच्या या वक्तव्यावर संताप व्यक्त करत, अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांना रवी राणा यांना समज देण्याची मागणी केली आहे.



रवी राणा यांनी महायुतीतील मित्रपक्षांचे, विशेषतः काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके आणि अभिजीत अडसूळ यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ते म्हणाले, अमरावतीत एखादी जागा कमी झाली तरी चालेल, पण जिल्ह्यात कमळ फुलले पाहिजे. या विधानामुळे राणा यांना विरोधी पक्षांच्या तावडीतून वाचता आले नाही. त्यांचे हे वक्तव्य महायुतीतील त्यांचे मित्रपक्ष देखील गुस्सेने स्वीकारत आहेत.मुख्यमंत्री शिंदे यांनी रवी राणा यांच्या विधानावर तात्काळ प्रतिक्रिया देत, महायुतीमध्ये सर्व काही व्यवस्थित चालले आहे, कुणीही 'मिठाचा खडा' टाकू नये. असा इशारा दिला. तसेच, शिंदे यांनी रवी राणा आणि त्यांची पत्नी नवनीत राणा यांना सांगितले की, तुम्ही महायुतीचे घटक आहात, आणि महायुतीचे सरकार तुमच्यामागे खंबीरपणे उभे आहे.

तर, अजित पवार यांनी रवी राणा यांच्या वक्तव्यावर आणखी टीका करत म्हटले, त्यांच्या बोलण्यामुळेच त्यांच्या बायकोचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. अजित पवार यांच्या या शब्दांनी रवी राणा यांना मोठा धक्का दिला आहे. पवार यांनी रवी राणा यांना सुचवले की, लोक काहीबाही बोलत असतात, पण प्रत्येक गोष्टीवर प्रतिक्रिया देत बसायचं नसतं. आणि फडणवीस यांना रवी राणा यांना समज देण्याचे सुचवले.रवी राणा यांच्या या विधानामुळे महायुतीमध्ये तणाव निर्माण झाला असून, आगामी निवडणुकीत त्यांचा प्रभाव कसा पडेल हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

### नांदेड शहराला प्रशासनाने घातली साद यावेळी करा रेकॉर्डब्रेक मतदान

# महावीर चौकातून मतदान वाढविण्याचे आवाहन स्वीप अंतर्गत निरीक्षकासह अधिकारी सहभागी

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यामध्ये गेल्या लोकसभा निवडणुकीत केवळ ६१ टक्के मतदान झाले होते. यावेळी ही टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढली पाहीजे यासाठी प्रशासन जोमाने कामाला लागले असून सर्वच स्तरातून प्रशासनाला प्रतिसाद मिळत आहे. आज महावीर चौकातील स्वीप अंतर्गत जाहीर कार्यक्रमामध्ये निवडणूक निरीक्षकांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. नांदेडकरांनी लोकशाहीच्या या पर्वात आपली जबाबदारी बहुसंख्येने पूर्ण करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.



दि. ११ नोव्हेंबर रोजी ८७–नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदान जनजागृती विशेष अभियान राबविण्यासाठी महावीर चौकात मनोरंजनासह प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी निवडणूक निरीक्षक श्रीमती बी. बालामाया देवी, श्रीमती पल्लवी आकृती, कालुराम रावत , शैलेंद्र कुमार, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, नांदेड वाघाळा शहर महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, श्रीमती अनुष्का शर्मा, मनपा अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, मनपा उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त संजय जाधव, सुप्रिया टवलारे, सहायक आयुक्त मिर्झा बेग, गुलाम सादिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी उपस्थित सर्व नागरिकांना निष्पक्षपणे व कुठल्याही प्रलोभणाला बळी न पडता मतदान करण्याची शपथ दिली. याप्रसंगी भोकर येथील स्वीप कक्षाचे अधिकारी श्रीमती सुमन गोणारकर आणि सुधांशु कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार राजा आता तरी तू जागा हो! कणखर लोकशाहीचा तू मजबूत धागा हो! या आशयाचे पथनाट्याचे सादरीकरण करीत मतदार राजाला मतदान करण्याचे राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले.

सादर करते समूहामध्ये सरस्वती कारले, सरस्वती जाधव, ज्योती पाटेकर, रूपाली कांबळे अनघा नरवाडे, वर्षा ढवळे, रेखा कांगठीकार, मनोरमा गोवंदे, रामेश्वर शिंदे, राजू सोनकांबळे, रंगराव कासराळे, प्रमोद फुलारी, गुलाब पावडे, साहेबराव डोंगरे यांचा समावेश होता.या मतदारसंघातील कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते केंद्र सरकारकडून आलेल्या केंद्रिय सुचना कार्यालयाच्या क्षेत्रीय प्रचार कार्यालयामार्फत जिल्ह्यात सुरु झालेल्या चलचित्र रथाचे उद्घाटन करण्यात आले. या रथाद्वारे मतदार संघातील शहरी आणि ग्रामीण भागात मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. जेणेकरून जास्तीत जास्त मतदान होऊन लोकशाही बळकट होईल. यानिमित्त स्वीप कक्षाद्वारे सेल्फी पॉईंट उभा करण्यात आला होता यामध्ये महाविद्यालयातील तरुण मतदारांनी आणि इतर सामान्य नागरिकांनी सेल्फी काढून आपला सहभाग नोंदवला.

**प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रापर्यंत पोह्रोचा**

लोकशाहीमध्ये प्रत्येक मताला महत्व आहे. आपला देश या लोकशाहीच्या आधारावर चालतो. पण मतदार राजा मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी थोडा निष्काळजी करतो. यावेळी आपल्या सर्वांना मिळून जास्तीत–जास्त मतदान करायचे आहे. काश्मीरसारख्या दुर्गम भागात आपल्यापेक्षा अधिक मतदान होते. यावेळी प्रत्येक नांदेडकरांनी मतदान करावे. आपले प्रत्येक मत हे आपल्या देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे मत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी व्यक्त केले.

# १४ नोव्हेंबरपासून शहरात डॉक्टरांच्या राष्टीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन

### हजार खेळाडूंचा सहभाग, १३ खेळांचा समावेश



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने १४ ते १७ नोव्हेंबर दरम्यान राष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा स्पर्धा आयएमएच्या दिल्ली येथील मुख्यालयाच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी देशभरातून जवळपास हजारांहून अधिक अलिओपॅथिक डॉक्टर खेळाडू शहरात दाखल होणार आहेत, अशी माहिती सोमवारी, ११ रोजी येथे विशेष पत्रपरिषदेत देण्यात आली.

या स्पर्धांमध्ये १३ खेळांचा समावेश करण्यात आलेला आहे, यामध्ये पुरुष क्रिकेट, महिला क्रिकेट, बॅडमिंटन, बास्केटबॉल, लॉन टेनिस, टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ, जलतरण स्पर्धा, वॉकथॉन, मॅरेथॉन, सायक्लोथॉन, थलेटिक्स आदी खेळ घेण्यात येणार आहेत. यासाठी शहरातील विविध मैदाने सज्ज करण्यात आलेली आहे. विभागीय क्रीडा संकुल, गरवारे क्रिकेट मैदान, एडीसीए एन–२, सिडको क्रिकेट मैदान, इंड्यूरन्स ग्राउंड, बॅक वूड अरेना टर्फ या ठिकाणी या स्पर्धा होणार आहेत.स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना वेलकम किट, सहभाग प्रमाणपत्र , एमएमसी ६ क्रेडिट पॉईंट दिले जातील, तर विजेत्या खेळाडूंना सन्मान पदक देऊन गौरविण्यात येणार आहे. येणाऱ्या खेळाडूंच्या भोजनाची व्यवस्था आयएमए कडून करण्यात आली आहे.याच वेळी तीन दिवसीय स्पोर्ट्स मेडिसिन परिषदेचेही आयोजनही १४ ते १६ नोव्हेंबरला होणार आहे. यात शहरासह महाराष्ट्र तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ डॉक्टर विविध खेळांमध्ये घ्यावयाची काळजी, समस्या, निदान व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, एमजीएम मेडिकल कॉलेज, रामचंद्र इन्स्टिट्यूट, सीएसएमएस मेडिकल कॉलेज आणि बदनापूर मेडिकल कॉलेजचे यासाठी सहकार्य लाभणार आहे.या स्पर्धेचे उद्घाटन १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. आयएमएचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. अशोकन, सचिव डॉ.अनिलकुमार नायक, माजी अध्यक्ष डॉ. शरदकुमार अग्रवाल, आयएमए महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम, सचिव डॉ. अनिल आव्हाड आदींच्या उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या अध्यक्षा डॉ. उज्वला दहिफळे, सचिव डॉ. विकास देशमुख , डॉ. प्रफुल्ल जटाळे आदी यासाठी परिश्रम घेत आहेत.

# मतदानाची टक्केवारी वाढवा;आकर्षक बक्षीसे जिंका

## स्वीप अंतर्गत बीएलओकरीता जिल्हा प्रशासनाचा अभिनव उपक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत उत्कृष्ट कार्य करून त्या क्षेत्रातील मतदानाची टक्केवारी वाढविणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) विधानसभा क्षेत्रनिहाय आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहे. स्वीप अंतर्गत जिल्हा प्रशासनाकडून बीएलओ करीता हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. विधानसभा निवडणूक कार्यक्रमानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा क्षेत्राकरीता दिनांक २० नोव्हेंबर रोजी मतदान केले जाणार आहे. जिल्ह्यातील मतदारांमध्ये मतदानाप्रती जनजागृती होऊन मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्वीप उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ज्या मतदान केंद्रावर कमी मतदान झाले होते, त्या मतदार संघावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) जर लोकसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीपेक्षा १० टक्के व त्यापेक्षा अधिक मतदान विधानसभा निवडणुकीत वाढविले तर अशा मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) विधानसभा क्षेत्रनिहाय आकर्षक बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी जाहीर केले आहे. जिल्ह्यातील सर्वच मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या दृष्टीने सर्वच मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात येत आहे. ज्या बीएलओच्या क्षेत्रातील मतदान केंद्रावर लोकसभा निवडणुकीपेक्षा जास्त मतदान झालेले आढळून येईल, त्यांची गुणानुक्रमे निवड करून प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम असे पाच विजेते घोषित करून त्यांना बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (बीएलओ) स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह प्रारंभ

## मन्मथ स्वामींची कार्तिक पौर्णिमेची ४५० वर्षांची अखंडित परंपरा आजही कायम

**बीड । प्रतिनिधी**

श्री मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत महादेव बाबा, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली यासारखे अनेक संत जिल्ह्यात होऊन गेले. अनेक वर्षाचा कालखंडामध्ये त्यांनी कीर्ती केली.



महाराष्ट्रामध्ये दोनच संत असे होऊन गेले की, त्यांनी संजीवन समाधी घेतली. 'संत ज्ञानेश्वर' आणि 'संत मन्मथ स्वामी' मन्मथ स्वामी यांची गेल्या ४५० वर्षां पासून कार्तिक पौर्णिमेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून 'श्रीक्षेत्र कपिलधार' महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये ओळखले जाते.श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताहाचे प्रारंभ दिनांक ९-११-२०२४ रोजी करण्यात आला असून या सप्ताहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भरातून गायक, वादक तसेच शिवकिर्तनकाराचे व भाविक भक्तांची उपस्थिती असते यामध्ये भजन, शिवकिर्तन, शिवपाठ, काकडा, भारुड, श्रीची महापूजा अन्नदान व शेज आरती तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व महा प्रसादाचे आयोजन करण्यात येते. येणार्या १५ नोव्हेंबर ला त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध राज्यातून पायी दिंडीयांचे आगमन होते . तसेच अनेक राज्यातून शेकडो दिंड्या या ठिकाणी येतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक भाविक या ठिकाणी आल्यावर समाधान व्यक्त करतो. आणि सर्व समाज एकत्र करून एक विचार या ठिकाणावरून घेऊन जातात.

या सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविकभक्तांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान पंचकमेटी, श्रीक्षेत्र कपिलधार येथील पुजारी विश्वनाथ बापू स्वामी, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, वैजिनाथ महाराज शिंदे दत्तसंस्थान बालाघाट यांनी केले आहे.

४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म माघ शुद्ध पंचमी १४८२ ला झाला.

जगाला पवित्र करण्याचे सामर्थ्य या वीरशैव कुळामध्ये आहे. त्याच कुळामध्ये ४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी मन्मथ स्वामी यांच्या आई पार्वती आणि वडील शिवलिंग स्वामी यांच्या पोटी झाला. मन्मथ स्वामी यांचा जन्म दिनोदर बाबा यांच्या आशीर्वादाने झाला होता. त्यांनी शिव सांप्रदायाचा पाया रोवाला तसेच लिंगायत वीरशैव साहित्याचे व समाजाचे ते जनक आहेत. भजन कीर्तन नामस्मरण ही परंपरा त्यांनी चालू केली. तसेच मन्मथ माऊलींनी शिव संप्रदायाचा पाया रचला व क्लस हा शिवसंत लक्ष्मण महाराजांनी रचला. लक्ष्मण महाराजांची समाधी जोड आष्टी येथे आहे. मन्मथ माऊलींनी पहिली ध्वज पताका खांद्यावर घेऊन कपिलधार ते शिखर शिंगणापूर पदयात्रा काढली.

या ठिकाणची आख्यायिका

या ठिकाणी कपिल मुनी यांचं वास्तव्य होतं. कपिल मुनी यांची गंगासागर येथे समाधी आहे. कपिल मुनी हे तपस्वी असल्यामुळे त्यांनी हे क्षेत्र दिनोदर बाबा यांच्या ओटीमध्ये टाकलं म्हणजे त्यांना दान केलं. दिनोदर बाबा हे एक तपस्वी महाराज होते. ते या ठिकाणी असलेल्या पंचकुंडाच्या ठिकाणी गुप्त झाले. त्याअगोदर दिनोदर बाबा यांनी हे तीर्थक्षेत्र मन्मथ स्वामी यांना स्वाधीन केलं होतं. मन्मथ स्वामी यांनी या ठिकाणी तपश्चर्या करून वयाच्या २६ व्या वर्षी संजीवन समाधी घेतली.

संजीवनी समाधी घेणारे महाराष्ट्रातील दुसरे संत मन्मथ स्वामी यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणार्या कपिलधार या ठिकाणी गेले. ४५९ वर्षापासूनची ही परंपरा व लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. संजीवनी समाधी घेणारे हे महाराष्ट्रातील दुसरे संत म्हणून ओळखले जातात. मन्मथ स्वामी यांनी 'परम रहस्य' हा ग्रंथ कपिलधार या ठिकाणी लिहिला. त्यावेळी त्याठिकाणी दुसरं प्राणी देखील वास्तव्यास होते. अनेक वाघ, सिंह, साप या ठिकाणी वास्तव्य होते. ज्यावेळी मन्मथ स्वामी त्या ठिकाणी तपश्चर्या करत असत त्यावेळी त्यांच्या अंगा खांद्यावर साप खेळत असत असा त्यांचा अनेक वर्षापासूनचा इतिहास आहे.

# मा.आ.संगिता ठोंबरे यांच्या समर्थकांचा अखेर नमिता मुंदडा यांना पाठींबा

**केज । शेख सज्जाद**

माजी आमदार संगिता ठोंबरे यांच्या उमेदवारीसाठी आग्रही असलेल्या व निवडणुकीत माघार घेतल्याने नाराज झालेल्या समर्थकांनी भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या उपस्थितीत रविवारी दि. १० रोजी होळ येथे पार पडलेल्या बैठकीत केज विधानसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार आमदार नमिता मुंदडा यांना पाठींबा दिल्याने त्यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला आहे. विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर होताच आमदार नमिता मुंदडा यांच्या विरोधात निवडणूक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक होते. त्यामध्ये माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी भाजपाकडून विद्यमान आमदारांना उमेदवारी मिळणार असल्याचे पाहून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केला. परंतू राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने निष्ठावंत असलेल्या पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे संगिता ठोंबरे यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. परंतू उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटच्या दिवशी त्यांनी नाट्यमय रित्या उमेदवारी अर्ज मागे घेत पृथ्वीराज साठे यांना पाठींबा दिला. त्यामुळे त्यांची चोवीस तासाच्या आत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली. हा निर्णय घेताना विश्वासात न घेतल्याने नाराज झालेल्या त्यांच्या समर्थकांनी अखेर रविवारी विजय केंद्रे यांच्या शेतात नंदकिशोर मुंदडा यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नमिता मुंदडा यांना पाठींबा जाहीर केला आहे.



यावेळी माजी उपसभापती नेताजी शिंदे, महादेव सुर्यवंशी, सुनील घोळवे, विजय केंद्रे, सुधाकर लांब, माऊली इंगळे, विकास करपे, साहेबराव नवगिरे, अरूण करपे, दिपक भाकरे, दत्ता लाड, रणजित तपसे, कृष्णा करपे,अंकुश शिंदे, कैलास सोनवणे, दत्ता शेप, सचिन तोडकर, बिभीषण शिंदे, शिवरूद्र आकुसकर, धनंजय देशमुख, नितिन बनसोडे, माऊली शिंदे, बबनराव धस, उत्तम धस, संदीप गायकवाड यांच्या बहुतांश संगिता

ठोंबरे यांचे समर्थक कार्यकर्ते उपस्थितहोते.

# भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्याच्या संरक्षण सचिव पदी अमरसिंग ढाका यांची निवड



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १० नोव्हेंबर रोजी मुंबई येथे भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय कार्यकारिणीची बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन दादर येथे संपन्न झाली. महाराष्ट्र राज्याची भारतीय बौद्ध महासभेची नवीन कार्यकारणीची निवड करण्यात आली. महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून यु .जी. बोराडे गुरुजी व महाराष्ट्र राज्य भारतीय बौद्ध महासभा संरक्षण उपाध्यक्ष म्हणून असिस्टंट स्टॉप ऑफिसर अशोक कदम यांची निवड करण्यात आली व भारतीय बौद्ध महासभा बीड पश्चिम चे कोषाध्यक्ष अमरसिंग लखमीचंद ढाका यांची महाराष्ट्र राज्य भारतीय बौद्ध महासभेच्या संरक्षण सचिव पदी निवड करण्यात आली. या निवडीचे सर्व बौद्ध बांधवांनी स्वागत व अभिनंदन केले.

### महात्मा फुले युवा दलाचा धनंजय मुंडेंना परळी विधानसभेत पाठिंबा

# महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख ॲड सतीश शिंदे यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन दिले पाठिंब्याचे पत्र

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस सह महायुतीचे परळी विधानसभेचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांना आता विविध क्षेत्रातून पाठिंबा वाढताना दिसून येत असून महात्मा फुले युवा दलाच्या वतीने धनंजय मुंडे यांना आज बिनशर्त पाठिंबा देण्यात आला आहे. महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक व प्रमुख सतीश शिंदे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह धनंजय मुंडे यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले.



महात्मा फुले युवा दल ही सामाजिक संघटना गेले अनेक वर्ष कार्यरत असून परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यात या संघटनेचे अनेक पदाधिकारी आहेत.

महात्मा फुले युवा दलाने कोणत्याही अटी शर्ती शिवाय धनंजय मुंडे यांना पाठिंबा दिला असून धनंजय मुंडे यांच्या निवडणुकीमध्ये सर्वतोपरी सहकार्य करण्याचा शब्द महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक व प्रमुख सतीश शिंदे यांनी दिला असून, धनंजय मुंडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

यावेळी महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख ॲड.सतीश शिंदे यांच्यासह जिल्हाध्यक्ष अजय शिंदे, जिल्हा सरचिटणीस बाबा राऊत, धनंजय शिंदे, महादेव हाके, राजाभाऊ शिंदे, नवनाथ पांचाळ, गणेश माळी, पप्पू गीते, सतीश खंडागळे, जनार्दन खंडागळे, सिद्धार्थ खंडागळे, रामेश्वर क्षीरसागर, अंगद खंडागळे, पप्पू खंडागळे, सचिन खंडागळे, सलमान कुरेशी यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मायबाप जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही-आ.संदीप क्षीरसागर

## नाळवंडी,ढेकणमोह मध्ये कॉर्नर सभा

**बीड । प्रतिनिधी**

यंदा तुतारी वाजवायची म्हणजे वाजवायची आणि परत एकदा तुम्हाला विधानसभेत प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठवायचे अशी, जनभावना ग्रामीण भागातून व्यक्त होत असून मायबाप जनतेच्या या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या कॉर्नर सभेदरम्यान म्हटले.




रविवारी (दि.१०) रोजी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारासाठी बीड तालुक्यातील नाळवंडी व ढेकणमोह येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी या भागातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. आ.क्षीरसागर यांना सर्वसामान्यांतून अतिशय सकारात्मक प्रतिसाद भेटत आहे. भेटीगाठी दरम्यान आ.क्षीरसागर यांनी, येत्या २० नोव्हेंबर रोजी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करा असे आशिर्वाद उपस्थितांकडे मागितले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख गोरख शिंगण तसेच या भागातील नागरिक, तरूण, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री साई सेवा मंडळ उरण विभागातर्फे उरण ते शिर्डी पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील श्री साईबाबांची मानाची पहिली पालखी म्हणून श्री साई सेवा मंडळाची दिंडी सुपरिचित आहे.सालाबादप्रमाणे या वर्षीही श्री साई सेवा मंडळ उरण विभाग यांच्यावतीने उरण ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.यंदाचे पदयात्रेचे हे २४ वे वर्षे आहे.श्री दत्तजयंती उत्सवानिमित्त श्री साईबाबांच्या भव्य पालखी, वारकरी दिंडी पदयात्रा श्री दत्तमंदीर देऊळवाडी-उरण येथून गुरवार , दि.५/१२/२०२४ रोजी सकाळी ६.३० वा. श्रींची आरती करून श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रस्थान होणार असून श्रींची पालखी शुक्रवार, दि. १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. श्री क्षेत्र पुण्यधाम शिर्डी येथे पोहोचेल.गुरवार



दि. ५/१२/२०२४ रोजी सकाळी ६ ते ६:३० वा. श्रींची पालखी व पादुका साईभक्त भाविकांच्या दर्शनासाठी देऊळवाडीतील श्री दत्तमंदीरामध्ये ठेवण्यात येणार आहेत. दरवर्षी पहिल्या दिवशी हनुमान कोळीवाडा येथील साई भक्तांतर्फे सुंदर अशी पालखी सजविली जाते.पालखीचे दर्शन घेण्यासाठी तरी साईभक्त भाविकांनी श्रींच्या पालखीचा व पादुकांच्या दर्शनाचा आवश्य लाभ घ्यावा.तसेच बाबांच्या पालखी दिंडी सोहळ्यामध्ये सामील न होणाऱ्या साईभक्त भाविकांनी पालखी दिंडी सोबत पाच पाऊले चालण्यासाठी व पायी चालत जात असलेल्या पदयात्री साईभक्तांना शुभेच्छा देण्यासाठी हजर राहून श्री साईंचा कृपा आशिर्वाद घ्यावा.असे आवाहन करण्यात आले आहे.पहाटे ५ वा. आरती, पूजन व भजन,५:१५ वा. ॐ श्री साईनाथाय नम: या मंत्राचा जप व पुढे मार्गस्थ प्रस्थान, दुपारी १२ वा. मध्यान्ह आरती,दुपारी १२:३० श्री साई सच्चरित्राचे, सामुदायिक साप्ताहिक पारायण तसेच साईस्तवन मंजुरी वाचन, दुपारी ३:३० वा पुढील मुक्कामाकडे प्रस्थान,ॐ श्री साईनाथाय नमः मंत्रांचा जप, सायंकाळी ६.१५ धुपारती असे दैनंदिन कार्यक्रम असून पालखी दिंडीच्या सांगता प्रित्यर्थ श्री साई भंडारा व श्री सत्यनारायणाची महापूजा शनिवार, दि.२१/१२/२०२४ रोजी श्री रत्नेश्वरी मंदीर,मु. जसखार येथे संपन्न होणार आहे.दिंडीत चालत जाणाऱ्या साई भक्तांचे पदयात्री फॉर्म भरण्यासाठी बोकडविरा बस स्टॉप जवळ, किरीट पाटील यांच्या कार्यालयात मंडळाचे तात्पुरते कार्यालय चालू केले आहे. त्याच ठिकाणी पदयात्रीचे फॉर्म भरले जातील याची पदयात्री साई भक्तांनी नोंद घ्यावी असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्विप मतदार जनजागृती १९० उरण तर्फे मतदान करण्याचे आवाहन



**उरण । प्रतिनिधी**

जेष्ठ नागरिक मॉर्निंग कट्टा उरण व एस.टी डेपो उरण या ठिकाणी मतदार जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी केंद्र प्रमुख निर्मला घरत , केंद्र प्रमुख बबन पाटील ,समता ठाकूर,संजय होळकर,संजय पाटील, संगिता गावंड यांनी मतदानाचे महत्त्व पटवून दिले, प्रकाश पाटील यांनी सर्वांचे स्वागत केले,संजय होळकर यांनी स्विप तर्फे स्वागत केले तर बबन पाटील यांनी मतदानाचे महत्त्व सांगितले. यावेळी कुलकर्णी सर,श्री.दर्णे, प्रकाश पाटील यांनी आपली मते मांडली,निर्मला घरत यांनी माहिती दिली,तर समता ठाकूर यांनी आभार मानले. यावेळी आनंद बुधे,नितीन पडते, दिनेश घरत, आदि मंडळी उपस्थित होती. यावेळी मी मतदान करणार या बोर्ड वर सह्यां करण्यात आले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.